# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**मुंबई शहरामध्ये एकात्मिक वाहनतळ व्यवस्था निर्माण करण्यासंदर्भात मोकळया जागांच्या सध्याच्या धोरणाचे कोणतेही उल्लंघन न करता वाहनतळ उभे करण्याच्या योजनेबाबत**

**(१) १२००० (०४-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असून एकात्मिक वाहनतळ व्यवस्था निर्माण करण्यासंदर्भात मोकळया जागांच्या सध्याच्या धोरणाचे कोणतेही उल्लंघन न करता वाहनतळ उभे करण्याच्या योजनेबाबत मा. मुख्यमंत्री यांनी मुंबई शहरातील वाहतुकीच्या समस्येचा आढावा घेण्यासाठी दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये अप्पर मुख्य सचिव, परिवहन विभाग यांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त योजना तातडीने राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१७) :** (१) मुंबई व ठाणे शहरातील वाहतूक समस्येबाबत चर्चा करण्याकरिता मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४.१.२०१५ रोजी बैठक गृह विभागाकडून आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मुंबई शहरातील पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था करणे या मुद्यावर मोकळ्या जागांवरील धोरणाचे कोणतेही उल्लंघन न करता (खेळाच्या मैदानाखाली पार्किंग लॉट तयार करण्याची बाब तपासण्यात यावी) पर्यायी व्यवस्थेचा शोध घेण्यात यावा असे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिलेले आहेत.

(२) व (३) मुंबई शहर व परिसरामधील वाहतूकीच्या समस्येच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.६२/२०१४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार मा.मुख्य सचिव यांचेकडेही सर्व संबंधितांची दिनांक ४.३.२०१५ रोजी बैठक पार पडलेली असून याबाबत मा.उच्च न्यायालयाने सुचविलेल्या पर्यायांचाही विचार करणेत आलेला आहे. वाहनतळांच्या

उपलब्धतेसाठी मैदानांच्या खाली वाहनतळ उपलब्ध होणेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबतचे विनियम बृहन्मुंबईची सुधारित प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करताना करावा, अशा सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देणेत आलेल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेची सुधारित प्रारुप विकास योजना शासनास सादर होणार आहे.

---

## मुंबईत पुनर्विकास योजनेत विकासकासह इतर संस्था एन.जि.ओ. यांचा सहभाग समाविष्ट करणेबाबत

**(२) २४७४० (११-०८-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरासह इतरही शहरात पुनर्विकासाचे काम केवळ विकासक यांचे माध्यमातून राबविले जाते परंतु मुंबईत विकासक घार्जीण्या शासनाने व महानगरपालिका यांचे धोरणामुळे पुनर्विकासाच्या ४८५० योजना रखडल्या असून ७० लक्ष लोक झोपडयात राहतात, २५ लाख जुन्या जिर्ण इमारतीत १५ लक्ष म्हाडाच्या वसाहती, ६५ हजार गृहनिर्माण संस्था या सर्वांचा विकास केवळ विकासकाचा समावेश आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, या विकास कामामध्ये इतर विकासकाचा समावेश ज्या संस्था बांधकाम क्षेत्रात नाविन्यपुर्ण कामे करणाऱ्याचा समावेश करण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-०८-२०१७) :** (१) व (२) मुंबई शहरामध्ये जुन्या जीर्ण उपकर प्राप्त इमारतींचा विकास हा विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३(७) व ३३(९) मधील तरतुदी अन्वये सोसायटी अथवा विकासकाच्या मार्फत मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर केला जातो. तथापि, असा पुनर्विकास योजनेत इतर संस्था एन.जी.ओ. यांचा सहभाग समाविष्ट करण्याबाबत कोणतीही तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत नाही.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ विनियम ३३(१०) च्या तरतुदीनुसार झो.पु.योजना राबविण्यात येते. यामधील तरतुदीनुसार मालक/ विकासक/ झोपडी वासीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था, म्हाडा, एमआयडीसी, एमएमआरडीए सारखी सार्वजनिक संस्था आणि एनजीओ यांना झो.पु. योजना राबविता येते.

मुंबई शहरातील म्हाडा वसाहतींमधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास वि.नि.नि.३३(५) अंतर्गत संस्थांना परवानगी देण्यात येते. पुनर्विकासासाठी विकासक/ठेकेदार यांची नियुक्ती सहकारी संस्था कायद्याअंतर्गत संस्थेमार्फत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील अतिधोकादायक आणि धोकादायक इमारतींबाबत**

**(३) ३०५२० (२१-०१-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील श्रीकृष्ण निवास इमारत दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी कोसळल्यानंतर ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व महापालिका आयुक्त, मुख्याधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेऊन जिल्ह्यातील अतिधोकादायक आणि धोकादायक इमारतीवरील कारवाईबाबतचा कृती आराखडा २४ तासात सादर करण्याचे आदेश दिनांक ५ ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले असता, कल्याण-डोंबिवली वगळता अन्य महानगरपालिका व नगरपालिकांनी अहवाल सादर केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यासाठी विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अंती ठाणे जिल्ह्यातील अतिधोकादायक आणि धोकादायक इमारतींवरील कारवाईबाबतच्या कृती आराखड्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१७) :** (१) व (२) सदर घटनेनंतर ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण डोंबिवली व नवी मुंबई महानगरपालिकांनी त्यांचे परिक्षेत्रातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत कृती आराखड्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास कळविलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी (मुंबई) कोळीवाडा येथे रिंगरोडचे बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४) ३२१४३ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) कोळीवाडा येथे ये-जा करण्यासाठी सद्यस्थितीत एकमेव मार्ग उपलब्ध असल्याने मोठया प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने सदर ठिकाणी रिंगरोड बांधकाम होणे अनिवार्य असल्याने रिंगरोडसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून माहे जानेवारी, २०१५ पासून सातत्याने मा.मुख्यमंत्री आणि पालकमंत्री, मुंबई यांचेकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार वरळी (मुंबई) कोळीवाडा येथे रिंगरोडचे बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१७) :** (१) याबाबतचे निवेदन प्राप्त झाले नाही.
(२) सद्य:स्थितीत वरळी कोळीवाडा येथे एकमेव जाणारा रस्ता असून सदर रस्त्याचे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी परिरक्षण करण्यात येते.

वरळी कोळीवाडा येथे सद्य:स्थितीत कोणताही रिंगरोड अस्तित्वात नसून संपूर्ण क्षेत्र हे समुद्रापर्यंत बांधकामांनी व्यापलेले आहे.

तसेच, सदर ठिकाणी सद्य:स्थितीत सन १९९१ च्या मंजूर पुनर्रचित विकास आराखड्यात तसेच, प्रारुप विकास आराखडा २०३४ मध्ये कोणताही रिंगरोड प्रस्तावित करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नगरपरिषदेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत (एल.टी.सी) लागू करण्याबाबत**

**(५) ३६९९६ (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोणकोणत्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत (एल.टी.सी) प्रत्यक्षात दिल्या जात आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नगरपरिषदेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पण रजा प्रवास सवलत (एल.टी.सी) लागू आहे काय,
(३) तसेच राज्यातील नगरपरिषदेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत (एल.टी.सी) लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१७) :** (१) शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक १०.०६.२०१५ अन्वये राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत अनुज्ञेय आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ (सन १९६२ चा अधिनियम क्र. ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन, ज्या जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत लागू आहे, त्यांना निर्णयातील तरतूदी योग्य फेरफारासह लागू करण्यात आल्या आहेत.
(२) राज्यातील नगरपरिषदेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत (एल.टी.सी.) लागू नाही.
(३) राज्यातील नगरपरिषदेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत (एल.टी.सी.) लागू करण्याची बाब सद्यस्थितीत विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानखुर्द-शिवाजी नगर मतदार संघातील महानगरपालिका शाळेत सुसज्य बालवाडी/ शिशु संस्कार केंद्र स्थापित करण्याबाबत**

**(६) ३९८१६ (१३-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्ह्याच्या ईशान्य मुंबई स्थित मानखुर्द-शिवाजी नगर मतदार संघातील या ठिकाणच्या महानगरपालिका शाळेत सुसज्य बालवाडी / शिशु संस्कार केंद्रे स्थापित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, पालकवर्ग, सेवाभावी संस्था यांनी माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान उत्तर पूर्व उपनगर जिल्ह्यातील शिक्षणाअधिकारी, महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) तसेच शासनाच्या नगरविकास विभागाकडे यांना लेखी निवेदनाद्वारे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०९-२०१७) :** (१) अशा प्रकारची निवेदने बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित जमिन म्हणून देण्यात आलेला भूखंड हा सीआरझेड मध्ये येत असल्याबाबत**

**(७) ४१९२३ (२८-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरणच्या जेएनपीटी प्रकल्पग्रस्तासाठी फुंडे जवळील १११ हेक्टरचा भूखंड मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित जमिन म्हणून देण्यात आलेला भूखंड सीआरझेड मध्ये येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त भूखंड सीआरझेड मधून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट करीता संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या जमिन मालकांना १२.५० टक्के योजनेअंतर्गत जमिन वितरीत करणेसाठी सुमारे १११ हेक्टर क्षेत्र उपलब्ध आहे व सदर योजनेची अंमलबजावणी होण्याअनुषंगाने सिडकोच्या सर्व साधारण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये पुष्पक नोडसाठीच्या नियमावलीच्या धर्तीवर २.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याची तरतूद समाविष्ट करण्याकरीता कलम ३७ (१) चे निदेश द्यावेत अशी विनंती सिडकोने शासनास केली आहे. त्यानुसार शासनाने सिडकोस दिनांक २८/१०/२०१६ रोजी कलम ३७(१) चे निदेर्श दिले आहेत.

---

**अल्पसंख्यांक व मागासबहुल नागरी क्षेत्राचा सर्वांगीण नागरी विकास साधण्यासाठी अंतर्गत सार्वजनिक शौचालय, शौचकूप यांच्या श्रेणीवाढ व विस्तारिकरणाकरिता आर्थिक तरतूद करण्याबाबत**

**(८) ४७८१० (१३-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील उत्तर-पूर्व या अल्पसंख्यांक व मागासबहुल नागरी क्षेत्राचा सर्वांगीण नागरी विकास साधण्यासाठी अंतर्गत सार्वजनिक शौचालय, शौचकूप यांच्या श्रेणीवाढ व विस्तारीकरणाकरिता भरीव आर्थिक तरतूद करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाजातील प्रमुखांनी, समाजसेवकांनी तसेच जनप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री (नगरविकास), राज्यमंत्री (नगरविकास), मंत्री (अल्पसंख्यांक विकास), राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (नगरविकास) तसेच महानगरपालिकेच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) शिवाजी नगर, गोवंडी येथील अंतर्गत विकसित रस्त्यांवर २३० मि.मी., ३०० मि.मी. व ५०० मि.मी. व्यासाच्या मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे अस्तित्वात असून सदर ठिकाणचा मलप्रवाह हा घाटकोपर- मानखुर्द लिंक रोडवरील १८०० मि.मी. व्यासाच्या मुख्य मलनि:सारण वाहिनीस जोडलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भद्रावती (जि.चंद्रपूर) स्थानिक पांडव वार्ड विश्वकर्मा नगरीतील श्रीनगरकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावरील पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(९) ५१५९६ (२९-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) स्थानिक पांडव वार्ड विश्वकर्मा नगरीतील माजी नगराध्यक्ष सुनिल नामोजवार यांच्या घरासमोरील श्रीनगरकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावरील पूलाला मोठे खड्डे पडल्याने वारंवार येथे अपघात होत असल्याने या पुलाची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या पुलाची दुरुस्ती तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :** (१) व (२) पांडव वार्ड विश्वकर्मा नगरीतील श्रीनगरकडे जाणा-या सार्वजनिक रस्त्यावरील पुलाच्या दुरुस्तीचे काम भद्रावती नगरपरिषदतर्फे करण्यात आले असून वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिठी नदीची स्वच्छता व सुशोभिकरण करण्याबाबत

**(१०) ५४६०६ (२६-०८-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नाल्यांचे स्वरूप आलेल्या मिठी नदीची स्वच्छता व सुशोभिकरण करून नौकाविहाराचा आनंद लुटण्याचे स्वप्नरंजन मा.मुख्यमंत्र्यांनी नुकतेच केले असून नदीपात्राचे सुयोग्य नियोजन करून त्यातून जलवाहतूकच नव्हे तर रशियातील सेंट पीटर्सबर्ग सारखे विलोभनीय पर्यटनस्थळ म्हणून मिठी नदीचा विकास करण्यासाठी पावले टाकली जाणार आहेत असेही जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरूवात करण्यात येणार आहे व किती कालावधीत पूर्ण होईल व त्यासाठी एकूण किती रक्कम खर्च करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ रोजीच्या महाप्रलयानंतर मिठी नदीच्या पुनरूज्जीवनाचा निर्णय घेवून कामास प्रत्यक्ष सुरूवात झाल्यानंतर तब्बल १० वर्षे लागूनही १६०० कोटी रूपयांहून अधिक खर्चाच्या या प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मिठी नदीची स्वच्छता व सुशोभिकरण करून नदीचे पुनरूज्जीवन करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०९-२०१७) :** (१), (२) व (३) मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ रोजीच्या महाप्रलयानंतर अशा प्रकारच्या पूर परिस्थितीच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.माधव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समितीची स्थापना केली होती.

डॉ.चितळे समिती, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र. पुणे तसेच आय.आय.टी. मुंबई या सल्लागारांनी सदर परिस्थिती पुन्हा उद्भवू नये म्हणून सादर केलेल्या अहवालानुसार मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.

मिठी व नदी विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात मिठी नदीचे रुंदीकरण व खोलीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले असून पहिल्या टप्प्यात ३१.८८ कोटी रुपये खर्च झाला आहे.

मिठी नदी विकास प्रकल्पाच्या दुसऱ्या १४.०४ कि.मी. लांबीच्या संरक्षण भिंतीचे काम, १.६८ कि.मी. सेवा रस्त्याचे काम व ५ पुलांचे काम पूर्ण झाले असून सदर कामांस रु. ६२७.९५ कोटी इतका खर्च झाला आहे.

मिठी नदी विकास प्रकल्पासाठी अद्यापपर्यंत सुमारे ६५९.८३ कोटी रुपये खर्च झाले असून उर्वरित कामांसाठी सुमारे ६११.६४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

(४) व (५) मिठी नदीची स्वच्छता व सुशोभिकरण करण्यासाठी आय.आय.टी. ने सादर केलेल्या अहवालानुसार, मिठी नदीत सोडण्यात येणारे सांडपाणी शक्य त्या ठिकाणांहून मलनि:सारण व्यवस्थेमध्ये वळविण्याची कार्यवाही सुरु आहे. याकरीता संचालक (अ.से.व प्र.) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट स्थापन करण्यात आला आहे.

जे सांडपाणी मलनि:सारण व्यवस्थेमध्ये वळविता येणार नाही त्याठिकाणी सल्लागारांची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत डी.पी.आर. बनविण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे.

मिठी नदी प्रकल्पाच्या उर्वरित कामास प्रमुख अडथळा नदीलगत असलेल्या अतिक्रमणाचा व प्रकल्पासाठी लागणाऱ्या मिठी नदी लगतच्या खाजगी जागांच्या भूसंपादनाचा आहे.

मिठी नदीलगत असलेल्या अतिक्रमणांचे निर्मलुन झाल्यानंतर तसेच मिठी लगतच्या खाजगी जमिनींच्या भूसंपादनाबाबत मा.उच्च न्यायालयात प्रलंबित याचिका क्रमांक १४७०/२०१२, २३९६/२०१३, २३९८/२०१३ मध्ये अंतिम करण्यात येणाऱ्या धोरणांनुसार मिठी नदी प्रकल्पातील उर्वरित संरक्षण भिंतीचे व सेवा रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

---

## गुरु-ता-गद्दी त्रिशताब्दी महोत्सवाकरिता नांदेड महानगरपालिकेला झोपडपट्टी निर्मूलनासाठी बीएसयूपी योजना मंजूर केल्याबाबत

**(११) ५९३५५ (२९-०८-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००७ मध्ये पार पडलेल्या गुरु-ता-गद्दी त्रिशताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नांदेड महानगरपालिकेला झोपडपट्टी निर्मूलनासाठी बीएसयूपी ही योजना मंजूर करुन यानुसार शहराच्या विविध दलित वसाहतीमध्ये २७ हजार घरकुले बांधून देण्याचा प्रस्ताव महापालिकेतर्फे सादर करुन याकरिता कोटयावधी रुपयांचा निधी देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्ध करुनही निर्देशित मुदतीत घरकुल बांधणीचा निश्चित आकडा गाठण्यास अपयश आल्याने खर्च न झालेले ४० कोटी रुपये तात्काळ परत करण्याचे आदेश माहे मार्च, २०१५ वा त्या दरम्यान केंद्र शासनामार्फत देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची योजना केंद्र शासनाच्या निकषानुसार राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यास जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०९-२०१७) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

केंद्र पुरस्कृत बीएसयुपी योजनेंतर्गत नांदेड शहराकरिता २७९८५ घरकुलांचे बांधकाम व मुलभूत सुविधा पुरविणे या कामासाठी रु.१११३.०० कोटी किंमतीच्या ११ प्रकल्पास मंजुरी प्राप्त होती.

(२) वस्त्रोद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी महानगरपालिकेस जागा हस्तांतरण न केल्याने एनटीसी मिलच्या जागेवरील डीपीआर क्र.३ अंतर्गत एकूण ५१३६ घरकुलांचा प्रकल्प रद्द करण्यात आला होता. केंद्र शासनाच्या दि. १७.९.२०१५ च्या सुधारीत मंजुरीनुसार उद्देशांक १० प्रकल्पांतर्गत २०९९३ घरकुलांपर्यंत सिमित करण्यात आला होता. सिमित घरकुलांपैकी १८०४० घरकुले पूर्ण करण्यात आली असून १७५९५ घरकुलांचे वाटप देखील करण्यात आले आहे. तर ७४८ इतकी घरकुले प्रगती पथावर आहेत.

अखर्चित निधी व्याजासह परत करण्याचे केंद्र शासनाचे निदेश आहेत. त्यानुसार रु. ४१.२६ कोटी निधी परत करावयाचा आहे.

मंजूर घरकुले पूर्ण करण्यासाठी सुरुवातीला मार्च, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतर केंद्रिय गृहनिर्माण व शहरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाने दि. १२ मे, २०१५ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनान्वये या कार्यक्रमातील मार्च, २०१२ पर्यंत मंजूर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ दिली होती. सदरची वाढीव मुदत देखील संपलेली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या २४ वॉर्ड मध्ये वितरीत केलेला निधी शौचालयांच्या सुयोग्य नियोजनअभावी वाया गेल्याबाबत

**(१२) ६५०२५ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या २४ वॉर्ड मध्ये वितरीत झालेला रु. ३ कोटीचा निधी सार्वजनिक शौचालयांच्या सुयोग्य नियोजना अभावी वाया गेला असल्याचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक शौचालयांच्या टाकीमध्ये स्फोट होऊ नये यासाठी बायोसेफ्टी टँक बसविणे, सॅनेटरी नॅपकीनचा कचरा जाळण्यासाठी ज्वलन भट्टयाची उभारणी करणे, बायोटॉयलेटसमध्ये प्रगत बायोकल्चर पद्धतीचा वापर करण्यासाठी शौचालयावर सौरउर्जा प्रकल्प सुरु करणे यासाठी हा निधी वापरणे शक्य होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१७) :** (१), (२) व (३) सन २०१५-१६ मध्ये वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालये तांत्रिक दृष्टीने अद्ययावत करण्यासाठी एकूण रु. ३ कोटी इतकी रक्कम वर्ग करण्यात आली होती,

परंतु सदर तरतुदीचा खर्च निरंक असून त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

• शहर (परि-१) मध्ये काही तांत्रिक बाबी व शौचालयाच्या देखभाल व परिरक्षणाकरिता स्थानिक सामाजिक संस्थांचा अभाव

• शहर (परि-२) मध्ये सॅप प्रणालीमध्ये निधी हस्तांतरीत करण्यात निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी

• पश्चिम उपनगरे (परि-३, ४ व ७) मध्ये सॅप प्रणालीमध्ये निधी वापरण्याचे प्राधिकार घेण्यामध्ये निर्माण झालेल्या अडचणी

• पूर्व उपनगरे (परि-५ व ६) मध्ये सॅप प्रणालीमध्ये निधी वापरण्याचे प्राधिकार घेण्यामध्ये निर्माण झालेल्या अडचणी

तथापि, सन २०१५-१६ मध्ये तरतुद केलेल्या इतर निधीमधून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनेक विभागांमध्ये शौचालय दुरुस्तीशी निगडीत विविध प्रकारची कामे करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोठा खांदा गावातील (ता.पनवेल, जि.रायगड) नागरिकांच्या विविध समस्यांबाबत**

**(१३) ६५४०५ (१६-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोठा खांदा गावातील (ता.पनवेल, जि.रायगड) नागरिकांनी त्यांच्या विविध समस्यांचे निवेदन पनवेल नगरपालिका व सिडको यांना दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनात कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत व त्या मागण्यांवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१७) :** (१) होय.

दिनांक २२.०७.२०१६ रोजीचे निवेदन सिडकोला प्राप्त झाले आहे.

(२) उक्त निवेदनात मौजे-मोठा खांदा (पनवेल) येथील नागरिकांनी खालीलप्रमाणे मागण्या केल्या आहेत :-

• गावामध्ये पिण्याचे पाणी साठविणेकरीता पाण्याची टाकी बांधणे.

• गावामध्ये पिण्याच्या पाण्याकरीता जी.आय.ए. (Grant In Aid) ची पाईपलाईन टाकणे.

• गावातील गावठाणमध्ये सीवर (ड्रेनेज लाईन) मलनि:स्सारण पाईपलाईन टाकून मिळण्याबाबत.

उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना नियमोचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या योजनेस मंजूरी मिळण्याबाबत**

**(१४) ६५७५४ (१६-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये फेरीवाल्यांचे संरक्षण व नियमन करणा-या योजनेच्या नियमांना नगर विकास विभागाने दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास अंतिम मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त फेरीवाल्यांचे संरक्षण व नियमन करणा-या योजनेच्या नियमांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सर्व महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील पदपथ फेरीवाला मुक्त करण्याच्या दृष्टीने सदरहू योजनेत शासनाने कोणती तरतूद केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०९-२०१७) :** (१) राज्य शासनाने दिनांक ०३.०८.२०१६ रोजी महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ प्रसिध्द केले आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने दिनांक १ मे, २०१४ पासून पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४ लागू केला आहे.

सदर अधिनियमातील कलम ३६(१) नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी नियमावली व कलम ३८(१) नुसार दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) २०१७ योजना प्रसिध्द केली आहे.

सदर योजनेतील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येत आहे.

---

**कलिना (सांताक्रुझ) येथील हंसभ्रग्रा रोड रुंदीकरण प्रकल्पाबाबत**

**(१५) ६५७७८ (१६-०१-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलिना (सांताक्रुझ) येथील हंसभ्रग्रा रोड रुंदीकरण प्रकल्पातंर्गत बाधित झालेल्या झोपडीधारकांना (आंबेडकरनगर) नविन शासन निर्णयानुसार पात्रता निश्चित करुन स्थलांतरण करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती झोपडीधारकांचे स्थलांतरण करण्यात आले वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सांताक्रुझ कलिना येथील हसंभग्रा रोड रुंदीकरण प्रकल्पांतर्गत बाधित झालेल्या पात्र झोपडीधारकांचे माहुल, चेंबूर येथे पुनर्वसन करण्याचे निश्चित झाले आहे.

अद्यापपर्यंत उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण निर्मुलन) व सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्राप्त परिशिष्ट-२ नुसार २५० पैकी १४० झोपडीधारकांना पात्र करण्यात आले असून, त्यापैकी ११७ बाधीत झोपडीधारकांसाठी सदनिका वाटपाबाबत सोडत काढण्यात आली आहे.

उर्वरित पात्र झोपडीधारकांसाठी पर्यायी सदनिकांची मागणी करण्यात आली आहे. तथापि, प्रत्यक्षात एकही बाधीत स्थलांतरीत झालेले नसून, २० बाधितांना पर्यायी सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत.

(३) अपात्र व अनिर्णित झोपडीधारकांनी अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमण निर्मुलन), वांद्रे (पूर्व) यांच्याकडे अपील दाखल केले असून, प्रत्येक अपिलाची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर त्यानुसार पात्र झोपडीधारकांची माहिती टप्प्याटप्प्याने महानगरपालिकेकडे येत असून, पर्यायी सदनिका देण्याची कार्यवाही पुन:श्च करावी लागत आहे.

तसेच, काही पर्यायी सदनिकांची ताबा देण्यापूर्वी दुरुस्ती होणे किंवा त्या बदलून देणे आवश्यक असून त्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कल्याण रेल्वे स्थानक ते महापे रोड पर्यंतचा जलदगती मार्ग तयार करण्याबाबत**

**(१६) ६७३८५ (१६-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण रेल्वे स्थानक ते महापे रोड पर्यंतचा जलदगती मार्ग तयार करण्याचा प्रस्ताव कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने माहे ऑगस्ट, २०१६ वा त्या दरम्यान तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-शीळ महामार्गाला समांतर असलेला रस्ता अमृत योजनेच्या बी.आर.टी.एस. प्रकल्पातून तयार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे वा हा समांतर रस्ता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१७) :** (१) व (२) कल्याण रेल्वे स्थानक ते महापे रोड पर्यंतचा जलदगती मार्ग तयार करण्याचे, तसेच कल्याण शीळ महामार्गाला समांतर असलेला रस्ता अमृत योजनेतून बी.आर.टी.एस. प्रकल्पातून तयार करण्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अथवा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून प्रस्तावित नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेतील वाढता गैरव्यवहार**

**(१७) ६७९४९ (१३-०२-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका गैरव्यवहारात नंबर वन असल्याची माहिती एसीबीच्या अहवालातून निदर्शनास आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०१.०१.२०१५ ते २१.१२.२०१६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांत एकूण ४१ गुन्हे नोंद करण्यात आले असून, ५० अधिकारी/कर्मचारी यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील लाचलुचपत प्रकरणी गुन्हा नोंद झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द महापालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका नियमावलीनुसार निलंबनाची कारवाई करण्यात येते.

तसेच, न्यायालयाने दोषसिध्दी दिलेल्या महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना महानगरपालिका सेवेतून काढून टाकणे अथवा बडतर्फ करण्याची कारवाई महापालिकेच्या सक्षम अधिकाऱ्याच्या मंजुरीने करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पगडीच्या घरांवरील हस्तांतरण शुल्क निश्चित करणेबाबत**

**(१८) ६९३४७ (१६-०१-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सदनिका नोंदणी करताना सुमारे चाळीस लाख रुपये विक्री किंमतीच्या सदनिकेवर घरमालकाकडून २४ टक्के प्रमाणे सुमारे १४ लाख ते २० लाख रुपये पर्यंतची पगडी रक्कम आकारली जाते याकडे मा.लोकप्रतिनिधी व गरजू सदनिका धारकांनी सातत्याने शासनाचे लक्ष वेधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदनिका हस्तांतरीत शुल्क तथा पगडी रक्कम घेण्याबाबतची तत्वे शासनाने अद्यापपर्यंत निश्चित केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इच्छुक सदनिका धारकांच्या घरमालकाकडून होणाऱ्या लुटीस पायबंद बसण्याच्या दृष्टीने प्रश्नाधीन सदनिका शुल्क निश्चित करण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०९-२०१७) :** (१) याबाबत या कार्यासनाकडे अशाप्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि भाडेकरुना संरक्षण मिळण्यासंदर्भातील निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(२) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९ मधील कलम ५६ अन्वये (i) मध्ये भाडेकरु याने मागणी केलेली प्रिमियमची रक्कम कायदेशीररित्या अदा करुन या भाडेकरुचे हक्क अन्य व्यक्तीस तबदील करता येतात, तर पोटकलम (ii) नुसार जागा मालक यांना प्रिमियमची मागणी करुन व कायदेशीररित्या प्रिमियमची रक्कम स्वीकारुन जागेतील भाडेकरुचा अधिकार तबदील करु शकतील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

शासनाने भाडेकरुंचे अधिकार तबदील करावयाचे झाल्यास ते कायदेशीररित्या तबदील व्हावेत व त्याबाबत होणारे व्यवहार पारदर्शक पध्दतीने व्हावे, याबाबत प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे शासनाने नवीन भाडेनियंत्रण कायदा पारित केल्यापासून पगडी अथवा प्रिमियम देऊन जागांचे व्यवहार हे कायदेशीररित्या व वाजवी किंमतीस होण्याकरीता आवश्यक असे कायद्याचे पाठबळ निर्माण झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हनुमानकोळीवाडा (ता.उरण, जि.रायगड) गावातील न्हावा-शेवा बंदरासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्याबाबत**

**(१९) ६९९५३ (१६-१२-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हनुमानकोळीवाडा (ता.उरण, जि.रायगड) गावातील ग्रामस्थांची न्हावा-शेवा (जवाहरलाल नेहरु बंदर) प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा व अन्य साधनसंपदेचा मोबदला अद्यापी देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विषयाबाबत विधानपरिषदेच्या विनंती - अर्ज समितीच्या सकारात्मक शिफारशीं वर देखील अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना विनाविलंब मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही. प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा व अन्य साधनसंपदेचा मोबदला अदा करण्यात आलेला आहे.
(२) व (३) नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा या गावांच्या पुनर्वसनाबाबत विभागीय आयुक्त, कोकण, जे.एन.पी.टी. व जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून प्राप्त अहवाल व विनंती अर्ज समितीसमोर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दि. ८.११.२०१६ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे निदेश दिले आहेत.

(अ) नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनासाठी त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या जमिनीपैकी जमीन सिडको महामंडळाने द्यावी.

(ब) हनुमान कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनासाठी जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांनी जमीन उपलब्ध करुन द्यावी व पुनर्वसनाची कार्यवाही करावी सध्याची जमीन जे.एन.पी.टी. ने ताब्यात घेऊन योग्य वापर करावा.

तसेच दि. १३.१.२०१७ च्या पत्रानुसार जमीन उपलब्ध करुन देण्यासाठी जे.एन.पी.टी. ला कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालाड (पश्चिम) येथे शाळेसाठी राखीव असलेल्या जागेवर करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम

**(२०) ७०५०४ (१६-०१-२०१७). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड (पश्चिम) येथे शाळेसाठी राखीव असलेल्या जागेवर सन २००८ साली अनधिकृत बांधकाम करण्यात आले असुन सदर अनधिकृत बांधकामाला ८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर सदर बांधकाम पाडण्याचे आदेश दिंडोशी न्यायालयाने महापालिकेला दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेला सदर बांधकाम पाडायचे नसल्याने या प्रकरणातील कागदपत्रेच गहाळ झाल्याची लेखी कबुली महापालिकेच्या पी/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता यांनी दिली असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१७) :** (१) सदर अनधिकृत बांधकामे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८.०२.२००८, ११.०३.२००८ व १८.०३.२००८ रोजी नोटीस देऊन निष्कासित करण्यात आली होती.

त्यानंतर त्याठिकाणी पुन्हा अनधिकृत बांधकाम केल्याचे सन २०१४ मध्ये निदर्शनास आले होते.

(२) सहाय्यक अभियंता (इमारत आणि कारखाने), पी/उत्तर विभाग यांनी माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने अशी माहिती दिली हे खरे आहे.

तथापि, महानगरपालिकेच्या अभिलेखात माहिती उपलब्ध असूनही ती पुरविण्यात आली नाही म्हणून संबंधिताविरुध्द चौकशी प्रस्तावित आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी सन २००८ मधील अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांची महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून संबंधितांवर वेतनवाढ / वेतनवाढी रोखणे तसेच दंड आकारण्याच्या शिक्षा बजावण्यात आल्या आहेत.

सदर ठिकाणी सन २०१४ मध्ये आढळून आलेल्या अनधिकृत बांधकामांना महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

तथापि, सदर बांधकामधारकांनी सादर केलेले जनगणना प्रमाणपत्र पडताळण्याबाबत जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) यांच्यामार्फत विनंती करण्यात आली आहे.

---

**मुंबईतील अनेक भागांमध्ये सार्वजनिक शौचालयाची कमतरता असल्याबाबत**

**(२१) ७२९३५ (१६-०१-२०१७). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक भागांमध्ये सार्वजनिक शौचालयाची कमतरता असल्यामुळे नागरीकांना आणि विशेषत: महिलांकरीता महापालिकेच्या १४३ उद्यान व मैदानांमध्ये शौचालयांची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील उद्याने व मैदानात पे ॲ्ंड यूज या तत्वावर शौचालये बांधण्याची परवानगी देण्यात आली असून सदरील शौचालये किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत १४३ उद्याने व मैदानांपैकी ३६ उद्याने/मैदानांत पे ॲण्ड युज या तत्वावर शौचालये बांधण्यात आली आहेत.

८ ठिकाणी शौचालये बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून, उर्वरित ९९ ठिकाणी शौचालयांच्या बांधकामासाठी महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत ना-हरकत देण्यात आली आहे.

---

**नरिमन पॉईंट येथील व्ही.व्ही.राव मार्गावरील रस्त्यांच्या दुतर्फा वाहनतळावर वाहन उभी करण्याकरीता कंत्राटदारांकडून पैसे घेतले जात असल्याबाबत**

**(२२) ७३९१९ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये कुलाबा, फोर्ट परिसरामधील ३९ वाहनतळावर वाहने उभी करण्यास कोणतेही शुल्क घेण्यास महापालिकेने मज्ज़ाव केला असतानांही ठेकेदार वाहनचालकांकडून बेकायदा शुल्क वसुली करित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नरिमन पॉईंट येथील व्ही.व्ही.राव मार्गावरील रस्त्यांच्या दुतर्फा वाहनतळावर वाहन उभी करण्याकरीता कंत्राटदारांकडून सर्रास पैसे मागितले जातात याकडे महानगरपालिकेच्या “ए” विभाग कार्यालयाने पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेने सदर वाहनतळांसाठी नव्याने निविदा काढल्या असता कंत्राटदारांनी कमी दराने निविदा भरल्याने कंत्राट न देण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती बेकायदा शुल्क वसूली करणाऱ्या कंत्राटदारांवर व त्यांना सहकार्य करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “ए” विभागातील ३५ नि:शुल्क वाहनतळांवर “नि:शुल्क वाहनतळ” असे नमूद केलेले फलक लावण्यात आलेले आहेत.

अशा नि:शुल्क वाहनतळांवर कंत्राटदार वसुली करीत नसून काही असामाजित तत्व वसुली करतात व अशा प्रकारच्या अनेक तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या असून, वेळोवेळी स्थानिक पोलीस स्थानकांना पत्रव्यवहार करुन सदर असामाजिक तत्वाच्या लोकांविरुध्द कारवाई करण्याबाबत कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

नरीमन पॉईंटमधील व्ही. व्ही. राव मार्ग या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत कोणताही कंत्राटदार नियुक्त करण्यात आलेला नाही.

(३) व (४) सदर कंत्राटदारांनी किमान बोलीपेक्षा कमी दराने निविदा भरल्यामुळे त्यांना कंत्राट देण्यात आले नाही हे खरे आहे.

बेकायदा शुल्क वसुली होऊ नये याकरिता महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

• सदर ठिकाणी वाहनतळ नि:शुल्क असल्याबाबतचे फलक लावण्यात आलेले आहे.
• स्थानिक पोलीस ठाणे यांना नि:शुल्क वाहनतळांची माहिती देण्यात आलेली आहे.
• मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे येथे अनधिकृतरित्या शुल्क वसुली करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या नि:शुल्क वाहनतळावर कोणत्याही असामाजिक तत्वाकडून पार्किंग शुल्काची वसुली होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत तसेच, याअनुषंगाने सुयोग्य नियोजन करण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) मधील टिटवाळा जवळील बल्याणी गावात स्वस्तात घर देण्याचे आमिष दाखवून परिसरातील रहिवाशांची फसूवणूक केल्याबाबत**

**(२३) ७४२५९ (२०-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) मधील टिटवाळा जवळील बल्याणी गावात स्वस्तात घर देतो असे सांगून परिसरातील रहिवाशांकडून लाखो रुपये जमा करून या भागातील रहिवासी व काँग्रेसचे बल्याणी अध्यक्ष इब्राहीम माय्युमिया उर्फ मामू याने रहिवाशांची फसवणूक केल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील आठ वर्षापासून भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात बेकायदा चाळी बांधल्या असून या अनधिकृत बांधकामांना कल्याण डोंबिवली पालिकेचे अधिकारी, कर्मचारी, वनविभाग व अन्य शासकीय अधिकारी मोठया प्रमाणात हफ्ते वसूल करून संरक्षण देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांनी आपल्या सदर भूखंडाची मोजणी करण्यासाठी भूमिअभिलेख कार्यालयाकडे अर्ज करूनही अधिकारी दुर्लक्ष करित असल्याने शासनाने याची चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व भूमाफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.

कल्याण तालुक्यातील टिटवाळा जवळील मौजे-बल्याणी गावात स्वस्तात घर देतो सांगून तेथील रहिवाशांची फसवणूक केल्याबाबत या भागातील रहिवासी मोहम्मद इब्राहिम बच्चुमिया मुजावर यांच्याविरुद्ध कल्याण तालुका पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण येथे भारतीय दंड विधान संहिता, कलम ४२० व ४०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

माहे जून, २०१६ या कालावधीत अनधिकृतपणे सुरु असलेल्या ३ गाळे, ७ खोल्या व ५२ जोते असे एकूण ६२ बांधकामांवर महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, वन विभागाच्या मालकीच्या जमिनीवरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटविण्याची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यात येत असून याकामी महानगरपालिका व पोलीस विभागामार्फत योग्य ते सहकार्य करण्यात येत आहे.

महानगरपालिकेमार्फत दि.०२ मार्च, २००९ च्या शासन निर्णयानुसार निर्धारित प्रक्रिया अवलंबून अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई नियमित करण्यात येते.

(३) श्री.नजीम अब्दुल अजीज रहिम यांच्या अर्जानुसार दि.२४/०२/१९९८ रोजी मौजे-बल्याणी, ता.कल्याण येथील स.नं.९७/३ बाबत मोजणी करण्यात आली आहे. तद्नंतर सदर क्षेत्रामधील हद्द कायम मोजणीबाबतचा कोणताही प्रस्ताव उपअधिक्षक, भूमी अभिलेख, कल्याण यांच्याकडे प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील मानवी वस्ती व रस्त्यांच्या लगत असलेल्या गाई-म्हशींच्या गोठ्यामुळे साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याबाबत

**(२४) ७४३०७ (२०-०४-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मानवी वस्ती व रस्त्यांच्या लगत असलेल्या गाई-म्हशींच्या गोठ्यातील शेण-मलमुत्राचा रस्त्यावर व नाल्यांमध्ये जाणारा राडारोडा यामुळे शहरामध्ये लेप्टोस्पायसिस या साथीचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे महापालिकेने या गोठ्यांच्या विरोधात पोलीसात तक्रार करुन न्यायालयातही दावे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर गोठे मुंबई शहराबाहेर नेण्यासाठीच्या केलेल्या योजनांची गत १० वर्ष अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर गाई-म्हशींच्या गोठ्यामुळे रहिवाशांना लेप्टोस्पायसिसचा वाढता धोका लक्षात घेऊन शासन तातडीने कोणती उपाययोजना करणार आहे त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१७) :** (१) सदर प्रकरणी जनहित मंच या अशासकीय संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल केली असून, सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहे.

(२) मा. न्यायालयाने मुंबईतील सर्व तबेले बृहन्मुंबईच्या बाहेर दापचेरी येथे हलविण्याचे आदेश दिलेले आहेत.

तथापि, मुंबई व मुंबई उपनगरातील गुरांचे तबेले मुंबई बाहेर स्थलांतरीत करण्यासाठी तसेच गुरांचे तबेले मुंबई बाहेर स्थलांतरीत न करण्यासाठी अशा दोन्ही प्रकारच्या विविध याचिका मा. उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी अंमलबजावणी करणे शक्य झालेले नाही.

(३) बृहन्मुंबईमध्ये तबेल्यांच्या अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगराई संदर्भात तबेलेधारकांविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४(१), ३८१, ४१२(अ), २७९, ३६८ आणि भारतीय दंडसंहिता कलम २६९, २७० अन्वये जून २०१६ पासून कारवाई करण्यात आली आहे.

---

## मनिकंडा संघ, नेरुळ यांनी सिडको आणि महानगरपालिकेची दिशाभूल करुन इमारत बांधकाम केल्याबाबत

**(२५) ७५२२९ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील नेरुळ सेक्टर २९, भूखंड क्र. १६ मधील ३०० मीटर भूखंडाचा वापर केवळ मंदिरासाठीच करण्याची करारनाम्यात अट असताना मंदिरासोबतच बहुउद्देशीय इमारत बांधल्याची बाब माहितीच्या अधिकारात माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनिकंडा संघ, नेरुळ यांनी सिडको आणि महानगरपालिकेची दिशाभूल करुन इमारतीस बांधकाम परवानगी मिळविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

नवी मुंबई नेरुळ, सेक्टर क्र.२९ येथील भूखंड क्र.१६ येथे ३५८.८८७ चौ.मी. क्षेत्रात मंदिर वापराकरीता मे.नेरुळ श्री.मनिकंडा सेवा संघम यांना शासनाच्या गृहविभागाचा ना-हरकत दाखला व सिडकोकडून Aesthetic View सादर करण्याच्या अटीवर जोत्यापर्यंतच्या बांधकामास नवी मुंबई महानगरपालिकेने दि.०७/०७/२०१४ रोजी परवानगी दिली होती.

तथापि, उक्त अटींची पुर्तता न केल्याने सदर संस्थेचा भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेने नामंजूर केला आहे.

सदर ठिकाणी केलेले बांधकाम हे करारनाम्यातील अटीनुसार असून बहुउद्देशीय इमारत बांधण्यात आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या सी वॉर्ड मधील बहुसंख्य चाळी व इमारती जीर्ण झाल्याबाबत**

**(२६) ७६१५७ (२०-०४-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या सी वॉर्ड मधील बहुसंख्य चाळी व इमारती जीर्ण झाल्या असुन त्यापैकी ब-याच पुनर्विकासाच्या प्रक्रियेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन पुनर्विकासाच्या धोरणात सातत्याने बदल करीत असल्याने या चाळी व इमारतींचा पुनर्विकास रखडल्याने या इमारती व चाळीमध्ये वास्तव्य करणा-या नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे
(२) व (३) अशी बाब नाही.
मा. सर्वोच्च न्यायालयाकडील आदेशानुसार मोकळी जागा ही जमीन पातळीवर प्रस्तावित करण्याचे तसेच फायर इंजिनची ये-जा सुलभ व्हावी म्हणून एका बाजूने किमान ६.०० मीटर अंतर ठेवण्याचे निर्देश आहेत. त्यामुळे अरुंद भूखंडाच्या विकासावर काही प्रमाणात निर्बंध येत असले तरी उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या विनियम ३३(७) मध्ये उपकरप्राप्त इमारतीचे भूखंड एकत्रित केल्यास, अशा एकत्रित केलेल्या भूखंडाना अधिक प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देणेची तरतूद आहे. तसेच विनियम ३३(९) च्या नागरी नूतनीकरण योजनेच्या तरतूदीनुसार (Cluster Development) धोकादायक इमारतींचा देखिल समूहाअंतर्गत पुनर्विकास अनुज्ञेय आहे.

---

**खार पूर्व (मुंबई) परिसरातील जवाहरनगर हिंदी महानगरपालिका शाळा इमारत धोकादायक असल्याचे कारण देत बंद करण्यात आल्याबाबत**

**(२७) ७६७१० (२१-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खार पूर्व (मुंबई) परिसरातील जवाहरनगर हिंदी महापालिका शाळा इमारत धोकादायक असल्याचे कारण देत अचानक बंद करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थांना अन्य शाळेत स्थलांतर करतांना विद्यार्थी /पालकांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) सदर शाळा बंद करण्यात आलेली नसून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळेपासून ५०० ते ७०० मीटर अंतरावर असणाऱ्या निर्मलनगर मनपा शालेय इमारतीत सदर शाळा स्थलांतरीत करण्यात आली आहे.
(२) सदर शाळेतील विद्यार्थ्यांना अन्य शाळेत स्थलांतरीत करण्यापूर्वी दिनांक २४.१२.२०१६ रोजीच्या पालकसभेत शाळा व्यवस्थापनामार्फत पूर्व सूचना देण्यात आली होती.
(३) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमार्फत होणाऱ्या रस्ता रुंदीकरणाच्या कामाबाबत**

**(२८) ७६९५९ (२१-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमार्फत होणाऱ्या रस्ता रुंदीकरणामध्ये डोंबिवली पूर्व भागातील मानपाडा रस्त्यावरील फडकेचौक ते आयकॉन रुग्णालय, टिळक रस्त्यावरील मंजुनाथ शाळा ते घरडा सर्कल रस्त्यावरील एकूण ४२० बांधकामे बाधित होत असल्याने महानगरपालिकेकडून नोटीस पाठविण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर रस्ता रुंदीकरणा मध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना कोणत्या स्वरूपाचा मोबदला देण्यात आला वा येणार आहे,
(३) असल्यास, महानगरपालिकेने उक्त प्रकरणी धोरण निश्चित केले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१७) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये डोंबिवली पूर्व भागातील मानपाडा रस्त्यावरील फडके रोड ते चार रस्ता व चार रस्ता ते आयकॉन रुग्णालय हा रस्ता अनुक्रमे २१ व २४ मी. रुंद, तसेच टिळक रस्त्यावरील मंजुनाथ शाळा ते मशाल चौक व मशाल चौक ते घरडा सर्कलपर्यंतचा रस्ता अनुक्रमे १८ व ३० मी. इतका रुंद करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर रस्त्याच्या आखणीमध्ये साधारणपणे ९० बांधकामे भागशः बाधीत होत असल्याने बाधीत मिळकतधारकांना महानगरपालिकेकडून नोटीसा देण्यात आल्या आहेत.
(२) व (३) सदर रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या जमीन मालकास जमिनीच्या मोबदल्यात शासन धोरणानुसार व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार हस्तांतरणीय विकास हक्क/चटई क्षेत्र

स्वरुपामध्ये मोबदला देण्याबाबत, तसेच विस्थापितांच्या पुनर्वसनाबाबत गठीत करण्यात येणाऱ्या पुनर्वसन समितीमार्फत आवश्यक कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेचे धोरण आहे. तथापि, उक्त रस्ते विकास योजनेनुसार विकसीत करण्याकरीताचे बाधीत क्षेत्र अद्याप महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नायर रुग्णालयातील न्यूक्लिअर मेडिसीन विभागातील रिया गामा काऊंटर मशीन तीन वर्षांपासून विनावापर पडली असल्याबाबत**

**(२९) ७७५६६ (२१-०४-२०१७). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेकडून गरीब रुग्णांना उपचार मिळावेत यासाठी लाखो रुपयांची नवनवीन मशिन्स खरेदी केली जातात मात्र या मशिन्सचा वापर रुग्णांसाठी होत नसून ती विनावापर पडून राहत असल्याची धक्कादायक माहिती नायर रुग्णालयात माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायर रुग्णालयातील न्यूक्लिअर मेडिसीन विभागातील रिया गामा काऊंटर ही मशीन तब्बल तीन वर्षांपासून विनावापर पडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मशीन अद्याप कार्यान्वित न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, मशीन्स कार्यान्वित करून रुग्णांना उपचार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१७) :** (१) "नायर रुग्णालयातील ते मशीन धूळ खातं" अशा आशयाची बातमी दिनांक ०७.०१.२०१७ रोजीच्या पुण्यनगरी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) नायर रुग्णालयाच्या न्युक्लिअर मेडिसीन विभागातील रिया गामा काऊंटर मशीन सन २०१३ मध्ये बसविण्यात आले होते.

सदर मशीन एप्रिल २०१६ पर्यत कार्यरत होते. तथापि, तांत्रिक बिघाडामुळे सदर मशीन बंद पडले आहे.

सदर मशीनची दुरुस्तीची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(४) व (५) सदर रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता थायरॉईट तपासणीची सुविधा रुग्णालयाच्या आंतरस्त्राव विभागात करण्यात आली आहे.

या विभागात रुग्णांना T३, T४, TS १७ व Hb/C या चाचण्या पूर्वीच्या शुल्कात व कमी वेळात दिल्या जातात.

---

**झुणकाभाकर केंद्रावर मोठ्या प्रमाणात परवानगी नसलेले पदार्थांची विक्री होत असल्याबाबत**

**(३०) ७८५२३ (२१-०४-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर तसेच उपनगरामध्ये शासनाने गरीबांसाठी सुरु केलेल्या झुणकाभाकर केंद्रावर झुणका भाकर मिळत नसुन मोठ्या प्रमाणात परवानगी नसलेले पदार्थाची विक्री होत असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मान्यताप्राप्त झुणकाभाकर केंद्राच्या नावाखाली मोक्याच्या ठिकाणी असलेल्या सदर जागा भाडेतत्वावर देण्यास निर्बंध असतानासुध्दा स्टॉलधारक भाडेतत्वावर झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी देत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी वा पाहणी केली आहे काय, त्यानुसार दोषी असलेल्या किती झुणका भाकर केंद्र धारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१७) :** (१), (२) व (३) सन १९९५ साली सुरु झालेल्या २४८ झुणका भाकर केंद्रांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अन्वये खाद्यगृह (झुणका भाकर स्टॉल) या व्यवसायाचे अनुज्ञापत्र देण्यात आले होते.

दिनांक २७ जून, २००० रोजीच्या अधिसूचनेनुसार झुणका भाकर योजना रद्द झाल्यानंतर, बृहन्मुंबईत झुणका भाकर केंद्रांचे अन्नदाता आहार योजनेत रुपांतर करण्याचा निर्णय महानगरपालिकेने दिनांक २५.०२.२००९ रोजी घेतला.

सदर अन्नदाता आहार योजनेत बृहन्मुंबईतील एकूण १४९ झुणका भाकर केद्रांचे अन्नदाता आहार केंद्रात रुपांतर करण्यात आले असून, सदर अन्नदाता आहार केंद्रांमध्ये सर्व प्रकारचे शाकाहारी/मांसाहारी खाद्यपदार्थ विक्री करण्यास परवानगी आहे.

बृहन्मुंबईतील १९ झुणका भाकर केंद्रे बंद झाली असून, उर्वरित ८० झुणका भाकर केंद्रांविरुध्द महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अन्वये न्यायालयीन कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा दर्जा वाढविण्याबाबत**

**(३१) ७८८६७ (२१-०४-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा दर्जा घसरत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले व उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी महापालिकेकडून दर्जा वाढविण्यासाठी २४ विभागातील शाळांच्या इमारतीची पथक तपासणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तपासणी करण्यासाठी येणाऱ्या पथकात शिक्षणाधिकारी, संबंधित परीमंडळाचे उपशिक्षणाधिकारी, संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी (शाळा) आणि संबंधित इमारतीतील सर्व शाळांचे विभाग निरीक्षक यांचा समावेश असणार आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) महापालिका शाळात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले व उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी महापालिकेकडून दर्जा वाढविण्यासाठी २४ विभागातील शाळांच्या इमारतीची लेखी आदेश काढून पथक तपासणी घेण्यात आली आहे.

सदर तपासणी पथकात शिक्षणाधिकारी, संबंधित परिमंडळाचे उपशिक्षणाधिकारी, संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी (शाळा) व संबंधित इमारतीतील सर्व शाळांचे विभाग निरीक्षक यांचा समावेश होता.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मीरा-भाईदर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) महसूली गावांमधील जमिन बळकविण्याचे प्रकार भूमाफीयांकडून वाढल्याबाबत**

**(३२) ८०३७९ (२१-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईदर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) महसूली गावे एममएआरडीए क्षेत्रात गेल्याने तेथील नाले बुजविण्यात येऊन नाल्याची जमिन तसेच शेतजमिनी बळकाविण्याचे प्रकार भूमाफीयांकडून वाढल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार संबधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१७) :** (१) माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास उक्त गावांतील नाले बुजवून तेथील जमिन, तसेच शेतजमिन बळकाविल्याचे प्रकार भूमाफीयांकडून वाढल्याबाबतची कोणतीही तक्रार त्यावेळी नियोजन प्राधिकरण असलेल्या मुंबई महानगर प्रदेश

विकास प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही. दि.१६/०३/२०१७ पासून या क्षेत्राचे नियोजन प्राधिकरण मिरा-भाईंदर महानगरपालिका असून त्यांच्याकडेही याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेने विविध कामांचे प्रस्ताव मंजूर केल्याबाबत

**(३३) ८०९७७ (२१-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने विविध कामांचे तब्बल १२०० कोटी रुपयांचे प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत एका आठवडयात मंजूर केल्यानंतर दुसऱ्या आठवडयात आणखी १५०० कोटी रुपयांचे प्रस्ताव मार्गी लावण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीच्या अवघ्या ९० मिनीटाच्या बैठीकीत ९७ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावात त्रुटी राहण्याची शक्यता लक्षात घेता सदर प्रस्तावांची चौकशी करुन त्यावर निर्णय घेणे आवश्यक असल्याने या मंजूर झालेल्या प्रस्तावाच्या मंजूरींचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका स्थायी समितीच्या बुधवार दि. २१ डिसेंबर २०१६ रोजी भरलेल्या सभेमध्ये अंदाजे रुपये ९८६ कोटी इतक्या कंत्राट रकमेचे प्रस्ताव मंजुर करण्यात आले. तसेच बुधवार, दि. २८ डिसेंबर २०१६ रोजी भरलेल्या सभेमध्ये (दोन तहकुब सभांसहित) अंदाजे रुपये १२३० कोटी इतक्या कंत्राट रकमेचे प्रस्ताव मंजूर झाले.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका स्थायी समितीच्या बुधवार, दि. २१ डिसेंबर २०१६ रोजी भरलेली सभा, दुपारी २.०० वाजता सुरू होऊन दुपारी ३.२२ वाजता संपली, आणि बुधवार दि.२८ डिसेंबर २०१६ रोजी भरलेली सभा, दुपारी २.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०५ वाजता संपली. स्थायी समितीच्या सभांचे कामकाज हे नियमानुसार पार पाडले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील दहिसर पश्चिमेकडील चार वर्षापूर्वीच बांधलेल्या स्कॉयवॉकची डागडुजी करण्याबाबत

**(३४) ८१५६१ (२१-०४-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील दहिसर पश्चिमेकडील चार वर्षापूर्वीच बांधलेल्या स्कायवॉकचा स्लॅब अंगावर पडून दोन रिक्षाचालक व पादचारी गंभीररित्या जखमी झाल्याची घटना दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्कायवॉक हा नागरीकांना चालण्यास धोकादायक असल्याने पोलिसांनी बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित स्कायवॉकची डागडुजी करण्यास टाळाटाळ करणाऱ्या ठेकेदारांवर तसेच अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच मुंबईतील अशा ३७ स्कायवॉकची डागडुजी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या सूचनेद्वारे दिनांक ०७.०२.२०१७ रोजी संध्याकाळी उशिरा स्कायवॉकच्या पश्चिमेकडील जिन्याजवळील छोटा भाग पडल्याची घटना घडली होती.

परंतु सदर दुर्घटनेत कोणीही जखमी झाल्याची नोंद झालेली नाही.

(२) सदर स्कायवॉकच्या पश्चिमेकडील जिना पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेमार्फत बंद करण्यात आला आहे.
(३) व (४) सदर स्कायवॉक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात आला असून तो दिनांक २७.०४.२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर स्कायवॉकवर खड्डे पडल्यामुळे स्कायवॉकचे स्थितीदर्शक सर्वेक्षण करुन पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

---

## मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या ट्रान्झिट इमारतींमध्ये अनधिकृत कुटुंबे वास्तव्याला असल्याबाबत

**(३५) ८४७६० (२१-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरांतील म्हाडाच्या ट्रान्झिट इमारतीमध्ये जवळपास २३ हजार घरे आहेत त्यापैकी सुमारे आठ ते नऊ हजार घरांमध्ये अनधिकृत कुटूंबे वास्तव्याला असून या बेकायदा राहात असलेल्यांना कोणत्याही प्रकारे अधिकृत करण्याची तरतूद म्हाडा कायद्यात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाच्या घरातील घुसखोरांविरोधात म्हाडा कायद्याच्या तरतुदींच्या अनुषंगाने आजतागायत कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०८-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अनधिकृत/घुसखोर रहिवाशांविरुध्द म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ९५ अ (३) अंतर्गत वेळोवेळी निष्कासनाची तसेच इतर स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) म्हाड अधिनियम, १९७६ चे कलम ९५ अ (३) अंतर्गत निष्कासन मोहिमा राबविताना अपुरे मनुष्यबळ, अपुरा पोलीस बंदोबस्त, शैक्षणिक तसेच धार्मिक अशा विविध अडचणींमुळे सदर कारवाई पुर्णपणे सफल होऊ शकली नाही.

---

**मुंबईतील मदनपुरा या जागेत भूमिगत पार्किंग व अद्ययावत बाग बगिचा बनविण्याबाबत**

**(३६) ८४७६६ (२१-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झुला मैदान, मदनपुरा या जागेत भूमिगत पार्किंग व अद्ययावत बाग बगिचा बनविण्याच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेतर्फे नियोजित आराखडयास / अंदाजपत्रकास मंजूरी देऊन निधी मंजूर करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्पास लागून मदनपुरा, सांकली स्ट्रीट भागात विकासकांनी उभारलेल्या जवळपास १२ टॉवर्स मधील पार्किंगची जागा विकासकांनी गिळंकृत केल्याबाबत महानगरपालिकेने कोणतीही चौकशी वा कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील टॉवर्सची निर्मिती केलेल्या विकासकाच्या हस्तकांनी टॉवर्स मधील पार्किंग स्लॉटचा गैरव्यवहार लपविण्याच्या हेतूने सदरील भूमिगत पार्किंगचा प्रस्ताव जनतेची मागणी नसतानाही मंजूर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणच्या टॉवर्समधील पार्किंगच्या जागेची तरतुद मंजुर करण्यात आलेल्या नकाशानुसार असून विकासकाने कोणत्याही टॉवरमधील पार्किंगची जागा गिळंकृत केलेली नाही.

त्यामुळे सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईस्थित मदनपुरा, भायखळा भागातील बंद पडलेल्या हेरिटेज इमारतीतील मुक्ती फौज म्युनिसीपल दवाखान्याच्या नियोजित पुनर्विकासाबाबत**

**(३७) ८४७६८ (२१-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईस्थित मदनपुरा, भायखळा भागातील बंद पडलेल्या हेरिटेज इमारतीतील मुक्ती फौज म्युनिसीपल दवाखान्याचे नियोजित पुनर्विकासासंदर्भात मुंबई महानगरपालिकेतर्फे आराखडा / अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येऊन अल्पकालीन निविदा काढण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील दवाखान्यात विभागातील गरीब व गरजू महिलांना लाभ पोहचविण्यासाठी प्रसुतीगृह सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) भायखळा येथील मेघराज सेठी मार्ग येथील मुक्तीफौज म्युनिसिपल दवाखान्याच्या मोठया दुरुस्त्या व जीर्णोध्दार करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत प्रचलित पध्दतीने निविदा मागवून दिनांक २८.१२.२०१६ रोजी कंत्राटदाराला कार्यादेश देण्यात आला आहे.

तथापि, सदर कामाकरिता अल्पकालीन निविदा काढण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई परिसरात पार्किंगची समस्या निर्माण झाली असल्याबाबत**

**(३८) ८५३०५ (२३-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागातील औद्योगिक पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर विविध कंपन्या उभ्या राहिल्या असून त्यांनी पार्किंगचे वेळीच नियोजन केले नसल्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला अवजड व इतर वाहने उभी करून ठेवली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या दूतर्फा वाहने उभी करण्यात येत असल्यामुळे शहरात पार्किंगची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, पार्किंगची समस्या दूर करण्याबाबत काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१७) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
(३) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पार्किंगची समस्या दूर करण्याकरीता महानगरपालिका व नवी मुंबई पोलीस वाहतूक विभाग यांनी संयुक्तपणे सर्वेक्षण करुन नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक समस्येवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने विभागनिहाय नो-पार्किंग, सम-विषम पार्किंग व समांतर पार्किंग क्षेत्र निश्चित केलेले असून त्याबाबत पोलीस उपआयुक्त (वाहतूक), नवी मुंबई पोलीस यांनी दि.१६/११/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई पोलीस (वाहतूक) विभाग पार्किंग व वाहतूकीचे नियोजन व नियमन करत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेन्चुरी मिल, लोअर परळ या मिलच्या पुनर्विकासाबाबत

**(३९) ८५५३७ (२९-०७-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेन्चुरी मिल, लोअर परळ या मिलच्या पुनर्विकासात १७९८६ चौ.मी. जमिनीपैकी १३०९१.९० चौ.मी. जमिनीचा ताबा म्हाडास प्राप्त झाला असून उर्वरित ४८८८.७८ चौ.मी. जमिनीचा ताबा म्हाडास अद्यापही देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु जमिनीचा ताबा मिळेपर्यंत सदर मिलमधील व्यावसायिक बांधकामांना स्थगिती देण्याची आवश्यकता असतानाही सदर व्यावसायिक बांधकामे आजमितीपर्यंत सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गिरणीच्या जागेवर सुरु असलेल्या बांधकामातील अनियमिततेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदरहू चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०८-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सुधारित विकास नियंत्रण नियमावली ५८ (१) (ब) अंतर्गत सेन्चुरी टेक्सटाईल मिलच्या मालकीचे तीन वेगवेगळे भूखंड असून त्याचा एकात्मिक अभिन्यास दि.१७.०३.२०११ अन्वये मंजूर केला आहे. सेन्चुरी टेक्सटाईल मिलकरीता श्री.नस्ली वाडीया यांनी सुमारे ४०१८०.४६ चौ.मी. इतकी जमीन भाडेतत्वावर दिली आहे. त्याजमिनीचे क्षेत्र वगळून उर्वरित जमिनीवर अभिन्यास मंजूर केला आहे. सदर मंजूर अभिन्यासा पैंकी म्हाडास एकूण १३०९१.९० चौ.मि. जमिनीचा ताबा प्राप्त झाला आहे.

सेन्चुरी टेक्सटाईल मिलकरीता श्री.नस्ली वाडीया यांनी सुमारे ४०१८०.४६ चौ.मी. इतकी जमीन भाडेतत्वावर दिलेल्या जमिनी पैंकी उर्वरित ४८८८.७८ चौ.मी. जमिनीचा ताबा म्हाडास प्राप्त होणे शिल्लक आहे. त्या ४०१८०.४६ चौ.मी. जमिनीवर कोणतेही व्यावसायिक बांधकाम सुरू नसल्याने त्या बांधकामांना स्थगिती देण्यात आलेली नाही.

उपरोक्त भाडे तत्वावरील जमीनीच्या क्षेत्रावरील विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम ५८ नुसार देय असलेले म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या हिश्याचे क्षेत्र देण्यासंबंधी गिरणी कामगार निवारा आणि कल्याण संघाने जनहीत याचिका क्रमांक ६४/ २०१४ उच्च न्यायालयात दाखल केली असुन सदर न्यायालयात प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेच्या रूग्णालयामधील डॉक्टर, परिचारिक व इतर पदे रिक्त असल्याबाबत

**(४०) ८६१२६ (२३-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महानगरपालिकेच्या रूग्णालयामधील डॉक्टर, परिचारिक व इतर ८८ मंजुर पदांपैकी केवळ ५२ पदांवरच पदनियुक्ती असल्यामुळे सामान्य रूग्णांना उपचारापासुन वंचीत राहावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गांधीनगर येथील महानगरपालिकेच्या रूग्णालयातील पॅथोलॉजी विभाग अनेक वर्षापासून बंद असून इसीजी टेक्नीशियन नसल्यामुळे इसीजी चतुर्थ श्रेणी कर्मचारी काढत आहे तसेच अनेक महत्वाची उपकरणे तंत्रज्ञा अभावी बंद आहेत, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, सदर रूग्णालयात अनेक वर्षापासून एमबीबीएस डॉक्टरची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेंतर्गत येणाऱ्या रूग्णालयांच्या पदानुषेश त्वरीत भरण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) ८८ मंजूर पदांपैकी ५२ पदावर कार्यरत कर्मचा-यांमार्फत सामान्य रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा देण्यात येत असून, कोणताही रुग्ण उपचारापासून वंचित राहतो, ही बाब खरी नाही.
(२) अंशत: खरे आहे.

इंदिरा गांधी रुग्णालय, गांधीनगर, नागपूर येथे रेन्बो मॅडीनोव्हा या संस्थेमार्फत पॅथॅलॉजी सेवा देणे सुरु होते. मागील १ वर्षापासून, त्यांनी तपासणी दर वाढविण्याची मागणी केल्यामुळे, सेवा खंडीत केली होती. त्याचवेळी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातंर्गत पॅथॅलॉजी सेवा सुरु आहे.

नव्याने रेन्बो मॅडीनोव्हा या संस्थेने पॅथॅलॉजी सेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत संमती दर्शविली आहे.

तसेच या रुग्णालयात ई.सी.जी. टेक्नीशियन उपलब्ध असून, त्यांच्यामार्फतच ई.सी.जी. काढणे सुरु आहे.

दवाखान्यातील उपलब्ध उपकरणे व यंत्रसामुग्री सुरु असून तंत्रज्ञा अभावी बंद आहे, हे खरे नाही.

(३) सध्या इंदिरा गांधी रुग्णालयात ७ एम.बी.बी.एस. डॉक्टर कार्यरत आहेत.

(४) व (५) महानगरपालिकेचा आकृतीबंध शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला असून, मंजूरीनंतर महापालिकेकडून पुढील कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

---

## नागपूर शहरातील अग्नीशमन विभागात ५३४ कर्मचाऱ्यांची नवीन मंजुर पदे रिक्त असल्याबाबत

**(४१) ८६१२७ (२३-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील अग्नीशमन विभागात नवीन ५३४ कर्मचाऱ्यांची मंजुर पदे रिक्त असल्याने नवीन केंद्र निर्मितीला विलंब होत असल्याचे, माहे मे, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागामध्ये अग्नीशमन प्रमुख-१, अग्नीशमन उपप्रमुख-१, विभागीय अग्नीशमन अधिकारी-२, सहायक विभागीय अधिकारी-४, अग्नीशमन केंद्र अधिकारी-९, सहायक केंद्र अधिकारी-२५, अग्नीशमन उपकेंद्र अधिकारी २४, प्रमुख अग्नीशमन विमोचक-३६, ड्रायव्हर-ऑपरेटर-१०५, वाहनचालक (दमकल)-१०, अग्नीशमन विमोचक (रेसक्यु)-३०७, मेकॅनिक कम ड्रायव्हर-१, फिटर कम ड्रायव्हर-९, इलेक्ट्रीशयन-९ अशी एकूण ५३४ कर्मचाऱ्यांच्या पदांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात सिव्हील लाईन मुख्य केंद्रासह ८ अग्नीशमन केंद्र कार्यरत असून कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीमुळे हा भार ५ केंद्रातील कर्मचाऱ्यांवर येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरीकांच्या सुरक्षेकरीता शासनाने नवीन १३ केंद्रासाठी दिनांक ३ मे, २०१६ रोजी अग्नीशमन विभागाच्या ८८५ पदांच्या आकृतीबंध प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मंजुर प्रस्तावानुसार त्वरीत पद भरती करण्यात येणार आहेत काय,

(६) नसल्यास, विलंबाची करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या कार्यरत ८ अग्निशमन केंद्राकरिता आवश्यक पद संख्येनुसार रिक्त पदांची संख्या ३७५ इतकी असून, रिक्त पदांमुळे केंद्र निर्मितीला विलंब होत असल्याची बाब खरी नाही.

अग्नीशमन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या त्रिमुर्तीनगर येथील जागेवर अग्निशमन स्थानकाचे बांधकाम सुरु असून, वाठोडा येथील स्थानकाच्या बांधकामासाठी निविदेची कार्यवाही सुरु आहे.

तसेच पाचपावली येथील जीर्ण स्थानकाच्या इमारतीचे पुर्नबांधकाम प्रस्तावित करण्यात आले असून, उर्वरित २ स्थानकांच्या जागेचा शोध सुरु आहे.

(२) यामध्ये अग्नीशमन केंद्र प्रमुख-१, अग्नीशमन उपप्रमुख-१, विभागीय अग्नीशमन अधिकारी-२, सहायक विभागीय अधिकारी-४, अग्नीशमन केंद्र अधिकारी-९, सहायक केंद्र अधिकारी-२४, अग्नीशमन उपकेंद्र अधिकारी २४, प्रमुख अग्नीशमन विमोचक-३६, ड्रायव्हर-ऑपरेटर-१०५, वाहनचालक (दमकल)-१०, अग्नीशमन विमोचक (रेसक्यु)-३०७, मेकॅनिक कम ड्रायव्हर-१, फिटर कम ड्रायव्हर-९, इलेक्ट्रीशयन-१ अशी एकूण ५२१ कर्मचा-यांच्या पदांचा समावेश आहे.

(३), (४), (५) व (६) अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या अग्नीशमन सेवा विभागाच्या आकृतीबंधास दि. ३ मे, २०१६ रोजी मान्यता प्राप्त झालेली असून, या पदांच्या सेवाप्रवेश नियमांना दिनांक १२ मे, २०१७ रोजी शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्यामुळे सध्या कार्यरत ८ अग्निशमन केंद्रानुसार पदोन्नतीची पदे भरण्यात आली असून, सरळसेवेने पद भरतीच्या प्रक्रियेकरिता आरक्षण स्थिती मंजूर करुन पद भरती प्रक्रिया करणे प्रस्तावित आहे.

---

## अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात दाखल झालेल्या मातेचा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे अर्भकासह झालेला मृत्यू

**(४२) ८६९०१ (२३-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात दाखल झालेल्या श्रावणी रविंद्र निकम यांचा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे अर्भकासह या मातेचा मृत्यू झाल्याचे धक्कादायक घटना दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित घटनेला जवाबदार असणाऱ्या दोषी डॉक्टरांविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०९-२०१७) :** (१) अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात श्रावणी निकम ही महिला प्रसुतीसाठी दि.०९.०६.२०१७ रोजी दाखल झाली होती.

सदर महिलेच्या बाळंतपणामध्ये गुंतागुंत होत असल्याचे निदर्शनास आल्याने दि.११.०६.२०१७ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात संदर्भित करण्यात आले.

तथापि, सदर महिलेस नातेवाईकांनी शहरातील ॲपेक्स हॉस्पीटल या खाजगी रुग्णालयात दाखल केले असता, तेथे तपासणी अंती सदर महिलेस मृत घोषित करण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) याबाबत रुग्णाच्या नातेवाईकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.

(३) या प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोरबे (ता.खालापूर, जि.रायगड) धरणातील पाणी अनधिकृतपणे टँकरद्‌वारे चोरी होत असल्याबाबत**

**(४३) ८८१९५ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरबे धरणातील (ता.खालापूर, जि.रायगड) पाणी नवी मुंबई तसेच पनवेल, उरण परिसरातील गावांना पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणा लगतच्या परिसरात मोठ मोठे प्रकल्प सुरू असून संबंधित विभागाला डावलून धनाढ्य प्रकल्प उभारणी करणाऱ्यांमार्फत अनधिकृतपणे पंपाद्‌वारे टँकरमध्ये पाणी भरून पाणी चोरी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृतपणे पाणी चोरी करणाऱ्या प्रकल्प मालकाविरूध्द संबंधित विभागाने गुन्हा दाखल केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१७) :** (१) व (२)

• मोरबे धरणातून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास तसेच जलवाहिनी लगत असलेल्या पनवेल तालुक्यातील आदई, सुखापूर, विचुंबे, चिखले, शिवकर, बोरले व तळेगाव या सात गावांना पाणी पुरवठा करण्यात येतो.

• धरणावर महानगरपालिकेची २४ तास सुरक्षा व्यवस्था कार्यरत असून जलवाहिनीस २४ तास गस्त घालण्यात येते. अशाप्रकारे पाणी चोरी न होण्याची सर्वप्रकारे दक्षता घेण्यात येते.

• तरीही पाणी चोरी आढळून आल्यास त्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या मागण्यांबाबत**

**(४४) ८९०५२ (२३-०८-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेला स्वच्छ भारत अभियानामध्ये सन २०१६-१७ मध्ये राज्यात प्रथम क्रमांक मिळाल्याचे केंद्रीय नगरविकास मंत्री यांनी दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास जाहिर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरस्कारास पात्र होण्यासाठी सफाईचे काम करणारे नवी मुंबई महानगरपालिकेच्या दोन हजार ९४० सफाई कर्मचारी किमान वेतनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आपल्या मागण्यांच्या संदर्भात ९८ ठेकेदाराच्या जाचातून सुटका करुन घेण्यासाठी मागील वर्षभरात २५ वेळा महानगरपालिकेसमोर आंदोलन केले तर माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये चार दिवस काम बंद आंदोलन करुनही त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सफाई कामगारांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना किमान वेतन अधिनियम, १९४८, दि.२४/०२/२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार किमान वेतन व वेतन वित्तलब्धी लागू करण्यास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१२७२ अन्वये दि.१५/०२/२०१७ रोजी मंजूरी दिली. तद्नंतर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६६८, दि.१९/०५/२०१७ अन्वये कंत्राटी सफाई कामगारांना माहे जून, २०१७ पासून किमान वेतन अदा करण्यासाठी मंजूरी देण्यात आली. त्यानुषंगाने माहे जून, २०१७ पासून कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन लागू करण्यात आले आहे.

(३) व (४) कामगारांच्या संघटनेने सफाई कामगारांना किमान वेतन मिळण्यासाठी दि.२२/०२/२०१६ रोजी आंदोलन केले. तर दि.२४/१०/२०१६ ते २७/१०/२०१६ या चार दिवसांचे काम बंद आंदोलन पुकारले होते.

तथापि, सफाई कामगारांना किमान वेतन मिळण्याबाबतच्या मागणीसंदर्भात तोडगा काढण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत त्रयस्थ सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. सदर सल्लागार संस्थेने केलेल्या शिफारशी व शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२४/०२/२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार कंत्राटी कामगारांना माहे जून, २०१७ पासून किमान वेतन लागू करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात सिंहस्थ कालावधीत बांधण्यात आलेले घाट व त्यालगतची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(४५) ८९२०० (२३-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात सिंहस्थ कालावधीत बांधण्यात आलेले घाट व त्यालगतची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घाट व त्यालगतची जागा तसेच साधुग्राम व इतर मोकळ्या भूखंडांचा वापर चौपाटी, विविध प्रदर्शने, सार्वजनिक सभा-समारंभ, फेस्टिवल, क्रीडा स्पर्धा व तत्सम प्रयोजनासाठी केल्यास त्याद्वारे शहराच्या पर्यटनात वाढ होऊन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल अशी सूचना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०९-२०१७) :** (१) सिंहस्थ कालावधीत बांधण्यात आलेले घाट देखभालीसाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

तसेच, कन्नमवार पुल ते लक्ष्मीनारायण पुला दरम्यानच्या घाटाची जागा विकसनासाठी महानगरपालिकेस वर्ग करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दि.१२.०२.२०१६ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे.
(२) होय.
(३) तसेच सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ३२५ एकर जागेपैकी महानगरपालिकेच्या मालकीच्या ५४ एकर जागा सिंहस्थ कालावधीव्यतिरिक्त इतर कालावधीत सार्वजनिक सभा, मेळावे, उत्सव, प्रदर्शन, क्रिडा स्पर्धा, वाहनतळ, सर्कस, इत्यादी साठी वापरणेबाबत महानगरपालिकेमार्फत निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मंजुरी मिळण्याबाबत**

**(४६) ८९२१६ (२३-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला शहरातील (जि.नाशिक) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत नागरी कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम सन २०१६ व केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारित केलेले नियम विचारात घेवून शहराचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१७) :** (१) व (२) स्वच्छ भारत अभियानातंर्गत येवला (जि. नाशिक) नगरपरिषदेचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा रूपये ४.४६ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूरीसाठी शासनास प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावास मा. मुख्य

सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

यानंतर सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव व निधी वितरणाकरीता केंद्र शासनास सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**कोल्हापूर थेट पाईपलाईन पाणीपुरवठा योजनेंतर्गत ठिपकुर्ली येथील पुलाच्या बांधकामांमधील गैरव्यवहार**

**(४७) ८९२४६ (२३-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर थेट पाईपलाईन पाणीपुरवठा योजनेंतर्गत ठिपकुर्ली येथील पुलाच्या बांधकामांमधील गैरव्यवहाराचा अहवाल दिनांक २१ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१७) :** (१), (२) व (३)

• कोल्हापूर शहरात मंजूर असलेल्या काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेंतर्गत ठिपकुर्ली येथील पुलाच्या बांधकामाचे अनुषंगाने ठेकेदारास अदा केलेली जास्तीची रक्कम त्यांच्या पुढील देयकामधून वसूल करण्याचा प्रस्ताव दि.१८.५.२०१७ रोजी आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांना सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे.

• त्यानुसार ठेकेदारास अदा केलेली जास्तीची रक्कम त्यांच्या पुढील देयकातून वजा करुन कोल्हापूर महानगरपालिकेकडून वसुल करण्यात आली आहे.

• तसेच, जास्तीचे देयक प्रस्तावित केल्यामुळे योजनेच्या सल्लागारांकडून सदर कालावधीतील अतिरिक्त प्रदान रकमेवरील व्याज त्यांच्या देयकातून वजा करण्याचे कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने प्रस्तावित केले आहे.

---

**देवडिया मॅटर्निटी होम दवाखाना व मिनी माता नगरातील दवाखाना मागील अनेक वर्षापासून बंद असल्याबाबत**

**(४८) ८९९२३ (२३-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील महानगरपालिका अधिनस्त देवडिया मॅटर्निटी होम दवाखाना व मिनी माता नगरातील दवाखाना गेल्या अनेक वर्षापासून बंद असल्याचे सदर दवाखाना बी.ओ.टी.तत्वावर चालविण्याचा प्रस्ताव असल्याचे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखाना मल्टीस्पेशलीटी धर्तीवर चालविण्यात येणार, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दवाखाना कोणत्या धर्तीवर चालविण्यात येणार त्याबाबत निकष ठरविण्यात आले आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१७) :** (१) व (२) होय.

येथे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत कम्युनिटी हेल्थ सेंटर सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) व (४) सदर दवाखाना बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यास निविदा काढण्यात आल्या होत्या, परंतु यास प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे, या ठिकाणी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत कम्युनिटी हेल्थ सेंटर नव्याने बांधण्याकरिता प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेच्या आतिक्रमण हटाव विभागाने मोहिमेवर जाण्यासाठी १५ हजार ५७५ रुपये घेतल्याबाबत

**(४९) ९०६४८ (२३-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेकडून सर्व प्रसासकीय आधीकाऱ्यांसह प्रमुख पधाधिकाऱ्यांना वाहन सुविधा पुरविण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतिक्रमण हटाव विभागाकडे प्रशासकीय कामासाठी २ वाहने देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तरीही अतिक्रमण हटाव विभागाने मोहिमेवर जाण्यासाठी १५ हजार ५७५ रुपये घेतले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव विभागाने मोहिमेवर जाण्यासाठी १५ हजार ५७५ रुपये घेतलेले नसल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या अमृत योजनेमधील शहरांचा प्रंलबित हिस्सा**
**स्थानिक स्वराज्य संस्थाना वर्ग करण्याबाबत**

**(५०) ९०९७५ (२३-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अमृत योजनेमध्ये राज्यातील ४४ शहरांचा समावेश केला असला तरी संबधित शहरातील विविध योजनांसाठी राज्य शासनाने मागील दोन वर्षातील निधीचा ५० टक्के वाटा उचलला नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने ४०० कोटी रुपयांचे अनुदान वितरीत केले असतांना राज्याने त्यांच्या हिस्सेचे ४७७ कोटी रुपयांपेकी फक्त २०९ कोटी वितरीत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधित शहरांचा प्रंलबित हिस्सा तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांना वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६ या वर्षाच्या मंजूर आराखडयाच्या प्रथम हप्त्यापोटी वितरीत केलेल्या १८२.९८ कोटी निधीच्या प्रमाणात राज्य शासन हिश्याचा रु.९१.४९ कोटी निधी अभियान शहरांना वितरीत केला आहे.

अमृत अभियानाच्या सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाच्या आराखडयापोटी केंद्र शासनाने अनुक्रमे रु.२३५.२० कोटी व रु.२८८.६३ कोटी निधी राज्य शासनास वितरीत केला आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार केंद्र शासन हिश्याचा निधी व त्याप्रमाणात राज्य शासन हिश्याचा अनुक्रमे रु.११७.६१ कोटी व रु.१४४.३४ कोटी इतका निधी राज्य अभियान संचालनालयाकडे वितरीत केला आहे. अमृत अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांचे कार्यादेश दिल्यानंतर प्रथम हप्त्याचा निधी संबंधित अभियान शहरांना वितरीत करण्यात येणार आहे.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.